'क' व 'ड' वर्ग महानगर पालिकांना, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या हद्दीतील मालमत्तांचे GIS आधारीत सर्व्हेक्षण व मॅपींगकरीता सहायक अनुदान वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन आदेश क्रमांक : बीएमसी-२५१७/प्र.क्र.७३४/नवि-२१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १३ एप्रिल, २०१८.

वाचा -

1) **शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र. बीएमसी-२५१७/प्र.क्र.७३४/नवि-२१, दि.३१.०३.२०१८**

शासन आदेश-

'क' व 'ड' वर्ग महानगर पालिकांना, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या हद्दीतील मालमत्तांचे GIS आधारीत सर्व्हेक्षण व मॅपींगच्या कामाकरिता नगर परिषद संचालनालयामार्फत सादर करण्यात आलेली महाआयटीची देयके अदा करण्याकरिता रु.१००.०० कोटी (रुपये शंभर कोटी मात्र) इतका निधी संदर्भिय दिनांक ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांना वितरित करण्यात आला आहे.

०२. उपलब्ध करुन देण्यात आलेला निधीचा विनियोग खालील अटी व शर्थींच्या आधारे करण्यात यावा.

१. उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी हा केवळ मालमत्ता निहाय सर्वेक्षणाकरिताच वापरावा. अन्य कोणात्याही प्रयोजनाकरिता निधीचा वापर करण्यात येऊ नये.
२. तसेच, संदर्भांकीत दिनांक ३१.०३.२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद अटी व शर्थींचे पालन करणे आवश्यक राहील.

०३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२६१४५२३८३५२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

A S Mutyal

Digitally signed by A S Mutyal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d4d464155269f77e479818a3758a4dfab5cc6f8907eae84ab75d58876c9aa8a5, serialNumber=bec50bca597e7b3fd46d9282c52300269eb689d8c130253fce76651562083f8b, cn=A S Mutyal
Date: 2018.04.26 14:55:49 +05'30'

(अ.शा. मुत्याल)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई - १८.
३. मा.राज्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
९. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन नवि-१६ नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. निवड नस्ती (नवि-२१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.